**प्रेसनोट**

**वाकड पोलीस ठाणे हद्दितील सराईत गुन्हेगार नामे, शाहरुख युनुस खान याचे टोळीवर मोका ( महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ ) अंतर्गत कारवाई केले बाबत.**

वाकड पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. ९९५/२०२३ भादवि. ३९५, ३२३, म.पो.अॅ. ३७(१)(३) सह १३५, क्रिमी. लॉ अमेंट. अॅक्ट ३, ७ चे तपासामध्ये आरोपी नामे, **(१)** शाहरुख युनुस खान, वय २९ वर्षे, रा. बालाजी कॉलेज गेट समोर, काळाखडक झोपडपट्टी, वाकड पुणे. **(टोळी प्रमुख) (२)** विकास ऊर्फ बाळा गोपाळ लोखंडे, वय २६ वर्षे, रा. मस्जिद समोर, काळाखडक झोप. वाकड पुणे. **(३)** आनंद किशोर वाल्मिकी, वय २८ वर्षे,रा. मस्जिद समोर, काळाखडक झोपडपट्टी वाकड पुणे. **(४)** जुबेर युनुस खान, वय २२ वर्षे, रा. पाण्याच्या टाकीमागे, काळाखडक झोपडपट्टी, वाकड, पुणे. **(५)** व्यंकटेश उर्फ विष्णु धर्मा कांबळे, वय २१ वर्षे, रा. वाकड सेंटर बिल्डींग समोर, काळाखडक झोपडपट्टी, वाकड, पुणे. यांचेविरुध्द **खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, दरोडा घालणे, जबर दुखापत करुन जबरी चोरी, साधी दुखापत, खंडणी मागणे, गैरकायद्याची मंडळी जमवून खुनाचा प्रयत्न करणे, सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करणे व बेकायदेशीररित्या घातक शस्त्रे जवळ बाळगणे असे एकुण १९ गंभीर गुन्हे पिंपरी चिंचवड शहरातील वाकड, सांगवी व हिंजवडी पोलीस ठाणेस दाखल असल्याचे** तसेच वरील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवून हिंसाचाराचा वापर करून वर्चस्वासाठी व आर्थिक फायद्यासाठी संघटितपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे विरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियत सन १९९९ अंतर्गत कारवाई करणे बाबत प्रस्ताव पोलीस आयुक्त कार्यालय येथे सादर केला असता सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करून महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश पारीत केलेले आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त, श्री. मनोज लोहिया, अपर पोलीस आयुक्त, डॉ. श्री. संजय शिंदे, श्रीमती. स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे), डॉ. श्री. काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२, श्री. पद्माकर घनवट, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली, श्री. बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, श्री. सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलीस ठाणे तसेच अंमलदार सचिन चव्हाण, पो.हवा. ४१५, व्यंकट कारभारी, पो.ना. ११७८, पी.सी.बी. गुन्हे शाखा व स.पो.फौ. सुहास पाटोळे, वाकड पोलीस ठाणे, यांचे पथकाने केली आहे.

सन २०२३ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील **०९ संघटीत गुन्हेगारी टोळ्यांमधील एकुण १२६ आरोपींवर** मोका कायद्या अंतर्गत कारवाई केलेली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उप आयुक्त, गुन्हे,**
**पिंपरी चिंचवड**

CamScanner